# समर्थन

# खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

## (सर्वसाधारण चर्चा)

## मार्च, २०२५

## (महाराष्ट्र राज्य)

## सन २०२४-२५














**समर्थन**

**१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ,**
**विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स (पू), मुंबई - ४०० ०२०**

**दूरध्वनी क्र. : ०२२-२२००३०६०**

**विश्लेषक : रुपेश किर : ९८९२९३९६१७, सहाय्य : स्नेहा घरत**

✉ : samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

# अर्थसंकल्पीय अधिवेशन-मार्च, २०२५

## (खर्चाचे पूरक विवरणपत्र - सर्वसाधारण चर्चा)

- सन २०२४-२५ या वर्षाचा मूळ अर्थसंकल्प **रु. ६ लाख ६९ हजार ४९० कोटी रुपयांचा** होता.
- सन २०२४-२५ या वर्षात **वित्तमंत्र्यांनी ६ लाख १२ हजार २९३** कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. असे म्हटले असले तरी **वित्तमंत्र्यांनी प्रस्तावित केलेल्या अर्थसंकल्पातून राज्य शासनाने देशांतर्गत घेतलेले कर्ज तसेच केंद्र शासनाकडून घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा रु. ५७ हजार १९७ कोटी हा महत्वाचा भाग वगळल्याचे निदर्शनास येते. वित्त विषयक विवरण पत्रात एकत्रित निधी ची रक्कम ज्याला मूळ अर्थसंकल्प असे म्हटले जाते ती रक्कम रु. ६ लाख ६९ हजार ४९० कोटी** इतकी होती.
- दि. ३ मार्च, २०२५ रोजी सादर केलेल्या पुरवणी मागणी रक्कम **रु. ६ हजार ४८६ कोटी २० लाख** इतकी.
- दि. ९ जुलै २०२४ रोजी सन २०२४-२५ साठी सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्या **रु. ९४ हजार ८८९ कोटी ६ लाखांच्या** होत्या.
- दि. १६ डिसेंबर, २०२४ मध्ये सादर झालेल्या पुरवणी मागण्या **रु. ३५ हजार ७८८ कोटी ४१ लाखांच्या आहेत.**
- जुलै-डिसेबर, २०२४ व मार्च, २०२५ रोजी सादर झालेल्या एकूण पुरवणी मागण्यांची **रक्कम रु. १ लाख ३७ हजार १६३ कोटी ६७ लाखांवर** पोहोचली आहे.
- मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत **५ ते १० टक्क्यांपेक्षा अधिक रकमेच्या** पुरवणी मागण्या करू नये, अशा गोडबोले समितीने शिफारशी सुचविलेल्या होत्या. मात्र असे असताना सन २०२४-२५ च्या मूळ अर्थसंकल्पात **एकूण पुरवणी मागण्यांचे प्रमाण २०.४९ %** इतके झाले आहे.

✍ सन २०२४-२५ चा मूळ अर्थसंकल्प (रु. ६ लाख ६९ हजार ४९० कोटी ६८ लाख) व एकूण पुरवणी मागणी **(रु. १ लाख ३७ हजार १६३ कोटी ६७ लाख) असून अर्थसंकल्पाची एकूण रक्कम रु. ८ लाख ६ हजार ६५४ कोटी ३५ लाखांवर पोहोचली आहे.**

✍ मार्च, २०२५ मध्ये एकूण २९ विभागांनी पुरवणी मागण्या केल्या असून त्यामध्ये ६९ मागण्यांचा समावेश असून २१४ बाबींचा अंतर्भाव आहे.

✍ पुरवणी मागण्या केलेल्या २९ विभागांपैकी २ विभागांनी सर्वात मोठ्या प्रमाणावर पुरवणी मागण्या केल्या असून सर्वात जास्त ग्रामविकास विभागाने म्हणजे रु. ३ हजार ६ कोटी २८ लाख (४६.३५%) तर उद्योग ऊर्जा व खनी कर्म विभागाने रु. १ हजार ६८८ कोटी ७४ लाख (२६.०३%), या दोन विभागांनी मिळून केलेल्या पुरवणी मागणीचे प्रमाण ७२.३८ % वर गेले आहे.

*(**स्रोत:** खर्चाचे पूरक विवरणपत्र, जुलै, डिसेंब,२०२४ व मार्च.२०२५. अंतरिम वित्त विषयक विवरण पत्र, फेब्रुवारी, २०२४ व अतिरिक्त अर्थसंकल्पीय अंदाज, जून २०२४)*

## अर्थसंकल्पीय अधिवेश मार्च, २०२५ मध्ये सादर झाल्या रु. ६ हजार ४८६ कोटी २० लाखांच्या पुरवणी मागण्या

### भांडवली स्वरूपाच्या पुरवणी मागण्यांचे प्रमाण केवळ ६ टक्के

तक्ता क्र. : १ (रु. कोटीत)

| मागण्यांचे स्वरूप | भारित | दत्तमत | एकूण | प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| महसुली | ७.३५ | ६,०८०.८५ | ६,०८८.२० | ९३.८६ |
| भांडवली | ३.३७ | ३९४.६३ | ३९८.०० | ६.१४ |
| **एकूण** | **१०.७२** | **६,४७५.४८** | **६,४८६.२०** | **१००.००** |

***स्रोत:*** *खर्चाचे पूरक विवरणपत्र, मार्च.२०२५.*


✍ मार्च २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन २०२४-२५ साठी रु. **६** हजार **४८६** कोटी **२०** लाखांच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या असून. त्यामध्ये **महसुली स्वरूपाच्या रु.** ६ **हजार** ८८ **कोटी** २० **लाखांच्या (९३.८६%) पुरवणी मागण्या असून रु.** ३९८ **कोटींच्या (६.१४%) भांडवली स्वरूपाच्या पुरवणी मागण्या आहेत.**

✍ तर **भारित स्वरूपाच्या रु. १० कोटी ७२ लाखांच्या (०.१७%) पुरवणी मागण्या असून रु. ६ हजार ४७५ कोटी ४८ लाखांच्या (९९. ८३%) दत्तमत स्वरूपाच्या आहे.**

## मूळ मागणीच्या तुलनेत पुरवणी मागणीचे प्रमाण पोहोचले २० .४९ टक्क्यांवर

## अर्थसंकल्पीय नियमंचा होतोय सर्रास भंग

आलेख क्र. १ रु. कोटीत




***(स्त्रोत:** खर्चाचे पूरक विवरण पत्र, मार्च.२०२५ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज- भाग-२)*

## जून २०२४ चा मूळ अर्थसंकल्प व वर्षभरातील पुरवणी मागणी

तक्ता क्र. : २ (रु. कोटीत)

| अ. क्र. | मागणी | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण (%) | मूळ मागणीशी पुरवणी मागणीचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| १ | जून, २०२४ चा मूळ अर्थसंकल्प | ६,६९,४९०.६८ | ८३.०० | १००.०० |
| २. | जुलै, २०२४ च्या पुरवणी मागण्या | ९४,८८९.०६ | ११.७६ | १४.१७ |
| ३. | डिसेंबर, २०२४च्या पुरवणी मागण्या | ३५,७८८.४१ | ४.४३ | ५.३५ |
| ४. | मार्च, २०२५ च्या पुरवणी मागण्या | ६,४८६.२० | ०.८० | ०.९७ |
| | **एकूण पुरवणी मागणी (२ ते ४)** | १,३७, १६३.६७ | १७.०० | २०.४९ |
| | **एकूण मागणी (१ ते ४)** | **८,०६,६५४.३५** | **१००.००** | **१२०.४९** |

*स्त्रोत : खर्चाचे पूरक विवरण पत्र, मार्च.२०२५ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज - भाग - २*

**वर्ष २०२४-२५ मध्ये पावसाळी अधिवेशनात पहिल्याच पुरवणी मागण्या रु. ९४ हजार ८८९ कोटी ०६ लाख रुपयांच्या तर डिसेंबर, २०२४ मध्ये करण्यात आलेल्या पुरवणी मागणीची रक्कम रु. ३५ हजार**

७८८ कोटी ४१ लाख होती तर मार्च, २०२५ मध्ये सादर झालेल्या पुरवणी मागण्या रु. ६,४८६ कोटी २० लाखांच्या होत्या.

- तिन्ही पुरवणी मागण्या मिळून त्याची एकूण रक्कम रु. १ लाख ३७ हजार १६३ कोटी ६७ लाख एवढी झाली असून मूळ अर्थसंकल्पात तीचे प्रमाण २०.४९ टक्के झाले आहे. मागील १० वर्षातील ही सर्वात जास्त रकमेची पुरवणी मागणी ठरलेली आहे.

## पुरवणी मागणी कधी करता येते ?

**नियम :**

- **अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना ज्याचा अंदाज करता आला नाही अशा कारणांमुळे खर्चासाठी नव्याने वा वाढीव तरतूद करावयाची झाल्यास किंवा**

- **अकल्पित व तातडीचा खर्च भागविण्यासाठी आकस्मिकता निधीतून घेतलेल्या अगाऊ रकमेची भरपाई करावयाची झाल्यास शासनाने मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत ५ ते १० % पेक्षा अधिक रकमेच्या पुरवणी मागण करू नयेत असा दंडक आहे. या पुरवणी मागण्यांचे प्रमाण गोडबोले समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार विभागनिहाय ५ ते १० % दरम्यान ठेवावे अशी शिफारस आहे, मात्र आतापर्यंत कोणत्याच सरकारने पुरवणी मागण्याबाबतचा हा नियम पाळलेला नाही.**

**वस्तुस्थिती :**

**मूळ मागणीच्या (अर्थसंकल्पाच्या) रु. ६ लाख ६९ हजार ४९० कोटी ६८ लाख इतकी होती, त्या तुलनेत सादर झालेल्या एकूण पुरवणी मागण्या ची रक्कम रु. १ लाख ३७ हजार १६३ कोटी एवढी झाली असून या अर्थसंकल्पात त्याचे प्रमाण २०.४८ % इतके आहे.**

## पुरवणी मागण्यांवरील चर्चेसंदर्भात अंदाज समितीचे मत!

**"मार्च, २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केवळ ०२ दिवस चर्चेसाठी दिला असून, २९ विभागांपैकी फक्त ०५ विभागांवर चर्चा होणार आहे. सर्व काम सुरळीत चालल्यास चर्चेसाठी ६ तास उपलब्ध होतात. त्यामध्येच खात्याच्या मंत्र्यांच्या उत्तराची वेळ समाविष्ट आहे म्हणजे साधारणत: एकूण २८८ सदस्यांपैकी मंत्रीगण व अध्यक्ष वगळून उरलेल्या सदस्यांना दोन दिवसांत १२ तास उपलब्ध असतात व ही वेळ बऱ्याचदा सदस्यांना अपुरी पडते. त्यामुळे बहुतेकदा चर्चा न करता विधानमंडळांकडून पूरक मागण्या मंजूर केल्या जातात ही वस्तुस्थिती आहे."**

**"बहुतांश पुरवणी मागण्या या खर्चाला औपचारिक मंजुरी मिळविण्यासाठी केलेल्या असतात. याचा अर्थ अर्थसंकल्पाला मंजुरी देताना विधिमंडळ ज्या खर्चांना मान्यता देते त्यासाठी रक्कम उपलब्ध न होता राजकीय हितासाठी केलेल्या पुरवणी मागण्यांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. असे असेल तर नियोजन, अर्थसंकल्प मंजुरी प्रक्रिया या औपचारिकता ठरतात. विधिमंडळाच्या 'अर्थसंकल्प मंजूर करण्याच्या अधिकारा' चा तो संकोच आहे. चर्चेशिवाय संमत होणाऱ्या पुरवणी मागण्या ही एक शासनाच्या अर्थसंकल्पातील गंभीर बाब असून त्यावर विरोधी पक्षाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. कारण याच कारणाने पुरवणी मागण्यांबाबतचा गैरव्यवहार वाढत चालला आहे. म्हणून पुरवणी मागण्यांवर चर्चा होण्याकरिता काहीना काही तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे."**

## मार्च, २०२५ च्या पुरवणी मागण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पुरवणी मागण्या केलेले ६ विभाग

तक्ता क्र. : ३ (रु. कोटीत)

| अ. क्र. | विभाग | रक्कम | प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १. | ग्राम विकास | ३,००६.२८ | ४६.३५ |
| २. | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म | १,६८८.७४ | २६.०३ |
| ३. | नगर विकास | ५९०.२८ | ९.१० |
| ४. | उच्च व तंत्र शिक्षण | ४१२.३६ | ६.३६ |
| ५. | सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ३१३.९३ | ४.८४ |
| ६. | पर्यावरण व वातावरणीय बदल | २५५.५१ | ३.९४ |
| ७. | **वरील ६ विभाग** | ६,२६७.१० | ९६.६२ |
| ८. | **इतर २३ विभाग** | **२१९. १०** | **३.३८** |
| | **एकूण** | **६,४८६.२०** | **१००.००** |

***स्रोत:*** *खर्चाचे पूरक विवरणपत्र, मार्च.२०२५.*

- मार्च,२०२५च्या पुरवणी मागण्यांमध्ये **एकूण २९ विभागांचा समावेश** असून त्यापैकी सर्वात जास्त **६ विभागांनी रु. ६ हजार २६७ कोटी १० लाखांच्या** पुरवणी मागण्या केल्या असून**,** एकूण पुरवणी मागण्यांमध्ये या रकमेचे **प्रमाण ९६.६२ % इतके मोठे** आहे. तर उर्वरित २३ विभागांनी रु. २१९ कोटी १० लाखांच्या पुरवणी मागण्या केल्या असून त्यांचे प्रमाण केवळ ३.३८ % इतके आहे.
- मार्चच्या पुरवणी मागण्यात एकट्या **'ग्राम विकास विभागा'ने रु. ३ हजार ६ कोटी २८ लाखांच्या पुरवणी मागण्या केल्या असून एकूण पुरवणी मागण्यांमध्ये ही रक्कम ४६.३५ % इतकी मोठी.**
- तर **'उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म" या विभागाने मिळून रु. १ हजार ६८८ कोटी ७४ लाखांच्या पुरवणी मागण्या केल्या असून, त्याचे एकूण पुरवणी मागणीतील प्रमाण २६.०३% इतके आहे.** या दोन विभागांनी मिळून केलेल्या पुरवणी मागणीचे प्रमाण ७२.३८ % वर गेले आहे.

# रु. ५ हजार ७९३ कोटी ५७ लाखांच्या मागण्या विना चर्चा मंजूर होणार !

## केवळ ०२ दिवसात रु. ६९२ कोटी ६३ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा !

तक्ता क्र. : ४ (रु. कोटीत)

| चर्चा होणारे विभाग | मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी रक्कम | मूळ मागणी रक्कम | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| **६ मार्च, २०२५** | | | | |
| सार्वजनिक बांधकाम | ६ | ४५.३५ | ३५,८३५.८८ | ०.१३ |
| सार्वजनिक आरोग्य | १ | १७ | १५,६४३.३७ | ०.११ |
| महिला व बालविकास | १ | ११ | १४,८८५.४० | ०.०७ |
| **७ मार्च, २०२५** | | | | |
| गृह विभाग | ४ | २९ | ३९,४०१.९८ | ०.०७ |
| नगर विकास | २ | ५९०.२८ | ५५,६९९.९५ | १.०६ |
| **चर्चेने मंजूर होणाऱ्या मागण्या** | १४ | ६९२. ६३ | १,६१,४६६.५८ | ०.४३ |
| **विना चर्चा मंजूर होणाऱ्या मागण्या** | ५५ | ५,७९३.५७ | - | |
| **एकूण** | **६९** | **६,४८६.२०** | **६,६९,४९०.६८** | **०.९७** |

*स्त्रोत : खर्चाचे पूरक विवरण पत्र, मार्च २०२५ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज - भाग - २*

✍ **दि. ६ मार्च, २०२५ रोजी १) सार्वजनिक बांधकाम, २) सार्वजनिक आरोग्य, ३) महिला व बालविकास तर दि. ७ मार्च, २०२५ रोजी १) गृह, २) नगर विकास विभागांच्या रु. ६९२ कोटी ६३ लाखांच्या (१०.६८ %) १४ मागण्यांवर चर्चा होणार आहेत तर उर्वरित २४ विभागांच्या ५ हजार ७९३ कोटी ५७ लाखांच्या (८९.३२%) ५५ मागण्या विना चर्चा मंजूर होतील.**

# १४ वी विधानसभा (कालावधी २०१९-२० ते २०२३-२४)
# महाविकास आघाडी व महायुती यांच्या काळात


## सादर झालेल्या पुरवणी मागण्या व त्यांचे प्रमाण


**सन २०१९-२०२२ या कालवधीत महाविकास आघाडीने मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण १३ टक्के होते.**

**सन २०२२-२०२४ या कालवधीत महायुतीने मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण १६ टक्के होते.**

आलेख क्र. : १

रु. कोटीत




*स्तोत्र : खर्चाचे पूरक विवरणपत्र, वर्ष २०१९-२०२० (डिसेंबर आणि मार्च) ते २०२४-२५ (जुन-जुलै)*


*टीप : वर्ष २०१९-२० मधील जुलै, २०१९ च्या पुरवणी मागण्यांचा समावेश नाही.*

- **१४ व्या विधानसभेच्या कार्यकाळात आपल्याला सातत्याने मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण वाढताना दिसत आहे.**
- **सन २०१९-२०२२ या कालावधीत महाविकासआघाडीचे सरकार होते. या काळात मूळ मागणीच्या तुलनेत पुरवणी मागणीचे प्रमाण हे १३ टक्के होते. मात्र २०२२-२०२४ या कालावधीत महायुतीसरकार आल्यानंतर मूळ मागणीच्या तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण १६ टक्क्यांवर गेल्याचे दिसून येते.**
- **यावरुन आपल्याला असे दिसून येते की, पुरवणी मागण्यांबाबत गोडबोले समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मूळ मागणीत पुरवणी मागण्यांचे प्रमाण ५ ते १० टक्के ठेवण्यात दोन्ही सरकारला अपयश आले आहे.**

## सन २०२४-२५ मध्ये महायुती सरकारच्या काळात सादर झाल्या १ लाख ३७ हजार १६३ कोटी रुपयांच्या विक्रमी पुरवणी मागण्या

**मागील ११ वर्षातील हा पुरवणी मागण्यांचा उच्चांक!**

आलेख क्र. २ रु. कोटीत




*स्त्रोत : खर्चाचे पूरक विवरणपत्र (वर्ष २०१४-१५-१६ ते २०२४-२५)*

- **सन २०१४-१५ ते २०२४-२५ या ११ वर्षाच्या कालावधीत प्रामुख्याने तीन सरकारे आलीत त्यामध्ये सुरुवातील २०१४-१५ मध्ये रु. ११ हजार ७३८ कोटी ८१ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या होत्या त्यानंतर पुरवणी मागण्यांच्या रकमेत सातत्याने वाढ होत राहिली आहे.**
- **सन २०२४-२५ या वर्षात सर्वात जास्त विक्रमी पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून या पुरवणी मागणीची रक्कम रु. १ लाख ३७ हजार १ ६३ कोटी इतकी आहे.**

## अ ) महायुती सरकारच्या काळातील पुरवणी मागण्या: (ऑगस्ट २०२२-२३ ते २०२४-२५)

तक्ता क्र. : ५ (रु. कोटीत)

| वर्ष | मूळ अर्थसंकल्प | एकूण पुरवणी मागणी | प्रमाण |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ५,४८,४०७.५२ | (ऑगस्ट, २०२२) २५,८२६.७१ | ४.७१ |
| | | (डिसेंबर, २०२२) ५२,३२७.८२ | ९.५४ |
| | | (फेब्रुवारी, २०२३) ६,३८३.९७ | १.१६ |
| | **एकूण** | **८४,५३८.५०** | **१५.४२** |
| २०२३-२४ | ६,०२,००८.२९ | (जुलै-ऑगस्ट, २०२३) ४१,२४३.२० | ६.८६ |
| | | (डिसेंबर, २०२३) ५५,५२०.७६ | ९.२२ |
| | | (फेब्रुवारी-मार्च, २०२४) ८,६०९.१७ | १.४३ |
| | **एकूण** | **१,०५,३७३.१४** | **१७.५** |
| २०२४-२५ | ६,६९,४९०.६८ | (जुन-जुलै, २०२४) ९४८८९.०६ | १४.१७ |
| | | (डिसेंबर, २०२४) ३५,७८८.४१ | ५.३५ |
| | | (मार्च, २०२५) ६,४८६.२० | ०.९७ |
| | **एकूण** | **१,३७,१६३.४६** | **२०.४९** |

*स्त्रोत : वित्त विषयक विवरण पत्र, खर्चाचे पूरक विवरणपत्र (वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५)*

- **वर्ष २०२४-२५ मध्ये पावसाळी अधिवेशनात पहिल्याच पुरवणी मागण्या रु. ९४ हजार ८८९ कोटी ०६ लाख रुपयांच्या तर डिसेंबर, २०२४ मध्ये करण्यात आलेल्या पुरवणी मागणीची रक्कम रु. ३५ हजार ७८८ कोटी ४१ लाख होती तर मार्च, २०२५ मध्ये सादर झालेल्या पुरवणी मागण्या रु. ६,४८६ कोटी २० लाखांच्या होत्या.**
- **तिन्ही पुरवणी मागण्या मिळून त्याची एकूण रक्कम रु. १ लाख ३७ हजार १६३ कोटी ६७ लाख एवढी झाली असून मूळ अर्थसंकल्पात तीचे प्रमाण २०.४९ टक्के झाले आहे. मागील १० वर्षातील ही सर्वात जास्त रकमेची पुरवणी मागणी ठरलेली आहे.**

## ब) महाविकास आघाडी सरकारच्या काळातील पुरवणी मागण्या:
## (डिसेंबर २०१९-२० ते मार्च २०२२-२३)

तक्ता क्र. : ६ (रु. कोटीत)

| वर्ष | मूळ अर्थसंकल्प | एकूण पुरवणी मागणी | प्रमाण |
|---|---|---|---|
| २०१९-२० | ४,०४,७९४.१९ | (डिसेंबर २०१९ व मार्च २०२०) ४०,८४४.०७ | १०.०९ |
| २०२०-२१ | ४,३४,०८४.७८ | ७२,१५२.०० | १७.३१ |
| २०२१-२२ | ४,८४,०९०.६७ | ६०,६९८.२८ | १२.५३ |
| **एकूण** | **१३,२२,९६९.६४** | **१,७३,६९४.३५** | **१३.१२** |

*स्त्रोत : वित्त विषयक विवरण पत्र, खर्चाचे पूरक विवरणपत्र वर्ष २०१९-२० (डिसेंबर २०१९ व मार्च २०२०) ते २०२१-२२*

- **महाविकास आघाडी सरकारच्या काळात सन २०१९-२० मध्ये मूळ अर्थसंकल्प रु. ४ लाख ४ हजार ७९४ कोटी १९ लाखांचा होता, त्या तुलनेत ४० हजार ८४४ कोटी ७ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून त्याचे प्रमाण १०.०९ टक्के इतके राहिले आहे.**
- **महाविकास आघाडी सरकारच्या काळात वर्ष २०२०-२१ मध्ये मूळ अर्थसंकल्प रु. ०४ लाख ३४ हजार ८४ कोटी ७८ लाखांचा होता, त्या तुलनेत रु. ७२ हजार १५२ कोटींच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या, मूळ अर्थसंकल्पातच्या तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण १७.३१ टक्के इतके होते.**
- **वर्ष २०२१-२२ मध्ये मूळ अर्थसंकल्प रु. ०४ लाख ८४ हजार ९० कोटी ६७ लाखांचा होता, त्या तुलनेत रु. ६० हजार ६९८ कोटी २८ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पुरवणी मागणीचे प्रमाण १२.५३ टक्के इतके मोठे राहिले होते.**
- **वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ या तीन वर्षाच्या कालावधीत मूळ अर्थसंकल्पांची एकूण रक्कम रु. १३ लाख २२ हजार ९६९ कोटी ६४ लाख होती, त्या तुलनेत रु. ०१ लाख ७३ हजार ६९४ कोटी ३५ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून त्याचे मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पुरवणी मागणीचे प्रमाण १३.१३ टक्के इतके राहिले होते.**

## क) युती (फडणवीस) सरकारच्या काळातील पुरवणी मागण्या:
## (डिसेंबर २०१४-१५ ते डिसेंबर, २०१८-१९)

तक्ता : ७ (रु. कोटीत)

| वर्ष | मूळ अर्थसंकल्प | एकूण पुरवणी मागणी | प्रमाण |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | २,१३,४६२.३१ | (डिसेंबर-मार्च) ११,७३८.८१ | ५.४९ |
| २०१५-१६ | २,४३,०२६.०९ | ३५,४६८.५२ | १४.५९ |
| २०१६-१७ | २,७०,७६३.९३ | ३३,६२६.३० | १२.४२ |
| २०१७-१८ | ३,००,३९७.६६ | ६३,८०७.४६ | २१.२४ |
| २०१८-१९ | ३,६७,२८०,८७ | (जुलै-डिसेंबर) ३१,७८२.२८ | ८.६५ |
| **एकूण** | **१३,९४,९३०.८६** | **१,७६,४१३.३७** | **१२.६५** |

स्रोत: (वित्त विषयक विवरण पत्र, खर्चाचे पुरक विवरणपत्र वर्ष २०१४-१५ ते २०१८-१९)

टीप: वर्ष २०१४-१५ मधील जुलै २०१५च्या पुरवणी मागण्यांचा समावेश **नाही**. तसेच मार्च, २०१९ मधील पुरवणी मागण्या येणे बाकी असल्याने वर्ष २०१४-१५ व २०१८-१९ मधील पुरवणी मागण्यांचे प्रमाण कमी दिसते.

- **वर्ष २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पात पुरवणी मागण्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे** ६३,८०७.४६ **(२१.२४%) राहिले आहे.**
- **मागील ५ वर्षातील अर्थसंकल्पाच्या (१३,९४,९३०.८६** कोटी **) तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण सरासरी १२.६५% आहे.**
- **एकाही वर्षी या फडणवीस सरकारला पुरवणी मागण्यांचे प्रमाण ५ % ते १० % दरम्यान ठेवता आलेले नाही.**